भारतीय संविधानच आम्हाला प्रकाशमान करणार आहे. ज्या संस्कृतीनं आम्हांला भीक मागायला लावलं, ती संस्कृती आम्ही नाकारत आहोत. खरं तर आमची रामोश्यांची संस्कृती समानता मानणारी होती. विधवेला पुनर्विवाह करण्याचा अधिकार होता. लग्न लावायला ब्राह्मणाऐवजी जंगम यायचे. पण हिंदुत्वकरणाच्या प्रक्रियेतून रामोशीही सुटले नाहीत. हिंदुत्वाच्या प्रक्रियेतून या समाजाला बाहेर काढण्यासाठी आंबेडकरी विचार संतोषला महत्त्वाचा वाटतो. आज भटके जयभीम म्हणायला लागले आहेत. २०१३पासून व्याल्ळी इथं पारध्यांच्या पालावर आंबेडकर जयंती साजरी करण्यात येत आहे. ही बाब संतोषला सकारात्मक वाटते.

भविष्यात संतोषला निर्माण अंतर्गत भटक्या विमुक्तांचं प्रशस्त असं रिसोर्स सेंटर उभारायचं आहे. जिथं या समाजासंबंधीची सर्व माहिती उपलब्ध असेल. सोबतच त्यांनी आता 'व्हिलेज इन्फर्मेशन सेंटर'चा प्रयोग हाती घेतला आहे. ज्याअंतर्गत गावातील लोकांना सरकारी काम आणि प्रक्रियांची माहिती उपलब्ध होईल. इंदापूरच्या प्रयोगशाळेतून एक मॉडेल जन्माला घालण्याचा संतोषचा प्रयत्न आहे. भटक्या - विमुक्तांच्या मुक्तीचं ते मॉडेल असेल.

सगळीकडं चॅरिटीचं काम फोफावत असताना संतोष मात्र त्यातून चळवळ उभारताना दिसतो. भटक्यांच्या पालांपर्यंत आंबेडकरी विचार आणि संविधान पोहचत नाही, तोवर त्यांची मुक्ती नाही, असं संतोषचं मत आहे.

●

(निर्माणच्या कामाशी जोडून घेण्यासाठी www.nirmanindia.org या संकेतस्थळाला भेट देऊ शकता किंवा nirmansocialgmail.com वरती संपर्क करू शकता. भ्र. ७२७६२२२२०५)

प्रकाशन दिनांक १-९-२०१७

महाराष्ट्रातील दलित आदिवासी आणि ग्रामीण साहित्याने आपल्या आसमंतातील घटना आपल्या अभिव्यक्तीच्या दायऱ्यात आणल्या. भटक्या विमुक्तातील अभिव्यक्तीकारांनी आपल्या दररोजच्या स्थलांतराच्या बदलत्या अनुभवांचा उलगडा आपल्या कवितेतून केल्याचे दिसते. लेखनासाठी समृद्ध, निरीक्षणात्मक सादरीकरणाची परंपरा यांचा एकत्रित स्वानुभव असल्याने भटक्या विमुक्तांची कविता एका वेगळ्या वळणाची दिसते.

# कविता

- **भरत दौंडकर**
- **सारिका उबाळे**
- **संतोष धर्मा राठोड**
- **नारायण भोसले**
- **चंद्रकांत पुरी**

# **भरत दौंडकर** यांच्या दोन कविता

**बाप**

बाप रोज प्यायचा दारू
धिंगाणा घालायचा
घाण घाण शिव्या द्यायचा
वाटायचं विद्रोह करावा
त्याच्या विरोधात
पण दगडांच्या विरोधात
तो दिवसभर लढायचा
विद्रोह काय असतो ते
त्याला कुणीच शिकवले नाही
उघड्या अंगावर ऊन गोंदुन घ्यायचा
पाहरीने भोकसून काढायचा परिस्थिती
सुतकीने फोडायचा आयुष्य...
माणूस महाबलाढ्य कसा बनला
हे शिकलो त्याच्याकडून
माझ्या दगडपाटीवर
त्याने उमटू दिले नाही
त्याचे हिंस्र अक्षर
पाहिरीची पेन्सिल व्हावी म्हणून
त्याने हळूच भोक पाडले माझ्या मनावर...
त्याचा बार उडाला
म्हणून तर मी शाबूत फुटलो
सरळ झालो
वळींब्यात जगायला शिकलो
ओबड धोबड दगडांना
माणसात आणून बसवणारा बाप
माणसातून का उठला
कळत नाही
दाखल्यावरच्या जातीचा हात धरताना
त्याचा हात का सुटला?
कळत नाही
नसता सुटला तरी
घट्ट पकडता आला असता का मला?
न पिताच आज किती जणांना चढली आहे
जगण्याची नशा
व्यवहारातील दगडांशी लढताना
किती शहाजोग झाली आहे दुनिया
तो असता तर आजही
तसाच वागला असता
काळजाच्या डबरात
कचाळून गेला असता
मी किती कविता लिहू
मनात जिवंत असलेल्या बापाच्या
जो भितो मला
आणि माझ्या लाल डोळ्यांना...

**दोरीवर चालणाऱ्या मुली**

दोरीवर चालणाऱ्या मुली
पायात भूक बांधून
चालत असतात म्हणून
जात नाही तोल
रस्त्यावरच्या आयुष्याचा
ग्रँट कॅनॉल
किती खोल असतो
हे जाणून आहेत त्या
रिटेक नाही

जगण्याच्या शो ला कुणी स्पॉन्सर नाही
तरीही त्या चालत राहतात
गरीबीच्या सुरकुत्यांचं
जागतिकीकरण होत नाही
हे जन्मजात कसं समजत असेल त्यांना?
अशा मुलींच्या कविता होऊ शकत नाहीत हे
बापांना कळायला हवे
त्या फक्त जगण्याचा तोल सांभाळून जगत असतात
जगण्याचे मोल ही तर फार दूरची गोष्ट आहे
अनादी कालापासून
हवेत तीन चार कोलांट्याउड्या मारणारे बाप
जिमन्याशियमचे कोच असायला हवे होते हा प्रश्न
सतावत नसेल का
या मुलींना
प्रत्येक बापाच्या मुली
रोज दोरीवर चालतात
दोरीची लांबी रूंदी बदलली
इतकेच

**भरत दौंडकर**
निमगाव म्हाळुंगी, जि.पुणे
ईमेल b.sdaundkar@gmail.com

**एकवस्त्रा**

मी रजस्वला
बसलेय अंग चोरून
घराबाहेरच्या पडवीत
युगांपासून तिष्ठत

मी अन्नपूर्णा
वरून वाढलेल्या पाण्याचा
ग्लास उपडा मारून ठेवलाय मी
दुरून ढकललेलं अन्नाचं ताट
नीट चावून खाऊन, संपवून
स्वच्छ करून ठेवलंय
कोरडं
अंथरुणाची वळकटीही
बारीक करून ठेवलीय
कोणी बाटणार नाही येता जाता
अशी
मी रजस्वला
मी जपतेय
माझी सावली पडू नये
पापड, शेवया, लोणची
वाळवणावर
मी जात नाही
कुठल्या धार्मिक कार्यात
विटाळ-चांडाळ करायला
मागच्या जन्मीच्या पापाचं फलित
हा स्त्री जन्म
याची मला पुरेपूर जाण आहे
माझा हात लागून
वाळू नयेत हिरवी झाडं
म्हणून मी फिरत नाही अंगणात
बाहेर
देवादारी हरिणालाही
उभं राहावं लागू नये
एका पायावर ताटकळत
म्हणून आज तिसऱ्या दिवशी
घेतलंय पाणी डोक्यावरून

मी रजस्वला
माझ्या ओटीपोटात
येत आहेत भयंकर कळा
पोटरीवर तटतटल्यात
वेदनेच्या हिरव्या निळ्या शिरा
पृथ्वी उमलून
कोंभ डोकावतानाची उलथापालथ
आणि प्रचंड कंबरदुखी
डोक्यावर पांघरुण घेऊन
अंग दुमडून
पडलेय मी एका बाजूला
शांत
पृथ्वीच्या पोटात
सीता गडप व्हावी तशी

मी रजस्वला
गातेय सृजनाचे गीत

भर दरबारात
पदर खेचत
अंतःपूरातून बाहेर आणणारे
हे हात कुणाचे आहेत?

**सारिका उबाळे-परळकर**
अमरावती
ईमेल sarikaubale077@gmail.com

## आम्ही चोरच राहिलो अन् तुम्ही पोलीस झालात

१८७१पासून ते
१९४७पर्यंत
भाऊ, तू गोरा होतास
तुझे केसं भुरे
आणि डोळे निळे
आम्ही चोर होतो
आणि तुम्ही पोलीस.
आता आमच्या सारखा
तू पण भुरा आहेस
तुझे केसं आणि डोळे काळे
तरीही आम्ही चोरच राहिलो
आणि तुम्ही पोलीस झालात.

गोऱ्या हाताने लिहिलेला
इतिहास उघड
तुला काळी पानं दिसतील
पालट ती पानं
तुझे हात काळे होतील
जेव्हा कधी १२ ऑक्टो. १८७१
हा दिवस वाचशील.
बघ तुझ्याच डोळ्याने
आम्ही काय नेलं
आणि त्यांनी काय केलं.

युद्ध तर होते भाऊ आपल्या स्वातंत्र्याचे
तुझ्या, माझ्या आणि बाकी सर्वांच्या.
१४ ऑगस्टचा सूर्य मावळला
आणि गोरा बायकोसह पळाला
१५ ऑगस्ट उगवताच
तुला स्वातंत्र्य मिळाले.
तुम्ही पोलीस झाले
अन् आम्ही चोरच राहिलो.

भाऊ, देवाला पूजलं
उपास ठेवले
आणि वाट पाहिली
आमच्या १४-१५ ऑगस्टची
त्या तारखाच निघून गेल्यात
कुठेतरी कायमच्या.

साहेबांची लाकडं फोडली
त्यांचे अंग दाबून दिले
पाणी भरलं
कोंबडं खाऊ घातलं
दारू पाजली
चोऱ्या त्यांनी केल्या
आळ आमच्या माथी घेतले.

तुमच्यासाठी ते तर गेलेत
आमच्यासाठी त्याने तुम्हाला शिकविले :
कसं खायचं,
कसं मारायचं
ढोरासारखं कसं वागवायचं.

भाऊ आम्ही तर 'लदेनी'
वाहत होतो
इज्जतीने खात होतो.
ते आले
रेल्वे आणली
तांड्याचा व्यवसाय विझवला.
तांडा म्हणजे तांड्याची नायकी.
अन् ते तांड्याचे महानायक झाले.

भाऊ चोरी हे गोचीड
कोणत्या एका जातीला चिकटत नाही
की कोणत्या एका जमातीचे रक्त पीत नाही
ते जन्मतात, जगतात, बदनाम करतात
माणसाला, ढोरांना, कोंबड्यांना, बकऱ्यांना
आणि इतर सजीवांना.

मग सर्व माणसं सोडून
आम्हीच कसे चोर झालो गडे?

बाबासाहेबाने जनावराची माणसे केलीत
नग्नावर कपडे झाकले
उपाशाचे पोट भरले,
तहानलेल्याला पाणी दिलं.
समाजातल्या गुलामांना
मुक्त केले
एका हाकेने.
त्यातून आम्ही कसे सुटलो गडे?
त्यांची हाक आमच्यापर्यंत पोहचली नाही का?
की आम्ही माणसासारखेच जगत होतो?
की आम्ही खरंच चोर होतो?
आम्हाला पण लुटलं
दुकानदारांनी
सावकारांनी
सरकारांनी
मग ते कोण होते?

गांधीजी तर खूप फिरले होते
समाज समजण्यासाठी
गोऱ्यांपासून मुक्त करण्यासाठी
गाव, शहर सोडून थोडं ते तांड्यात पण आले असते तर
नाही का त्यांना आमचं खाणं, पिणं, राहणं कळालं असतं
आणि आम्ही पण १४-१५ ऑगस्टलाच
माणसं झालो असतो
मुक्त झालो असतो
मत दिलं असतं.

तुम्ही तर मुक्त झाले
आम्ही राजाचेच घोडे राहिलो
राजा कोणीही असो
राजा तर पाठीवर घ्यायचाच होता.
माउंटबॅटन गेला
राजगोपालचारी आला
तरीही आम्ही आहो तेच आहोत.
पाहतोय वाट आमच्या गांधी, आंबेडकर, जीना,
आगरकर, सावरकरांची
कुठे असतील तर येतील?
तुमचे १४-१५ ऑगस्ट
आमचा ३१ ऑगस्ट झाला.
एकाच देशात दोन स्वातंत्र्य दिवस :
एक तुमचा आणि एक आमचा.
बहिरा आहे का साला
मी कधीपासून सांगतो
तो ऐकतच नाही?
कसा समजेल भाऊ तो
तुझ्या गोरबोलीला
तो गोर नाही
'कोर' आहे
नाहीतर गोरा आहे.

आम्ही चोरच राहिलो
अन् तुम्ही पोलीस झालात
भाऊ, तू तर गोरा होतास
तुझे केसं भुरे
आणि डोळे निळे
आम्ही चोर होतो
आणि तुम्ही पोलीस.
आता आमच्या सारखा
तू पण भुरा आहेस
तुझे केसं आणि डोळे काळे आहेत
तरीही आम्ही चोरच राहिलो
आणि तुम्ही पोलीस झालात.

**संतोष धर्मा राठोड**
मुंबई
ईमेल santoshrathod14@gmail.com

## लढताना पाहिले

बेचाळीस-पंचेचाळीसच्या पाऱ्यात
अनवाणी पायानं, मेच्या महिन्यात
टाक्कर भरत, गिरणेच्या वाळूत
अर्ध्या वस्त्रात, घामाच्या धारात
खोऱ्यानं पाटी भरत, रिकामी करत
आठ-दहा घंट्यात, दिस भरात
गुळचट चहाच्या घोटात, उपाशी पोटात
पोटुशी असलेल्या काडी देहात
लेकरू चीटताना, पान्हा अटताना
नजरा फिरताना, वस्त्र न्याहाळताना
सगळ असताना, काहीच नसताना
कोवळ्या, मध्यम अन म्हातारवयात
जास्त श्रमात, कमी दरात
तापानं फणफणताना, अंगार निघताना
दूर दवाखाना, औषधांविना
आटला पान्हा, भाकरीविना
पाच-पन्नास नात्यासह, आठ-दहा धर्मासह
चार हजार जातीसह आणि दोन हजार
जमातीसह
तेहतीस कोटी देवांसह आणि त्यांच्या
दलालासह
कवडी मोलास, आधाराविना
बिऱ्हाडासह, घरट्यांविना
निर्जीव पुंजके गुलाम पहिले
तांडे-तांडे झगडताना पाहिले
तोडताना बेड्या भांडताना पाहिले
भटक्या स्त्रियांना लढताना पाहिले

**नारायण भोसले**
मुंबई
ईमेल bhosalenr@gmail.com

## झोळी...

शहरातून जिल्ह्यात
जिल्ह्यातून तालुक्यात
तालुक्यातून गावात
गावातून गावकुसाबाहेर
गावकुसाबाहेरून पालात
पालातील देव्हाऱ्यातून
आकाशाकडे
माझा प्रवास चालू आहे
माझेच नशीब शोधण्यासाठी.

मी सांगतो भविष्य त्यांचे
मी हसवतो सांगून रेषा त्यांच्या हातांच्या
आणि रडवतो त्यांच्या कपाळावरील भाग्याला दोष देऊन
मी मात्र असतो स्थितप्रज्ञ,
माझ्याच रिकाम्या झोळीत हात ठेऊन.

हल्ली लोकही खूप चालू झालेत
आसारामसारखे
पाहतात भविषवेत्त्याचेच भविष्य
आणि मोजतात माझी कौशल्ये चाळून आधुनिक तंत्रज्ञान
भोंदू 'बापू'च्या फसव्या नजरेतून

आयुष्याची झोळी करावी म्हणतो होळी
मार्गच दिसत नाहीत दृष्टीपथात
शोधतोय मीच माझे भविष्य
रेषांच्याही पलीकडे जाऊन

बदलावे म्हणतो आता स्वतःला
स्वतःच्याच भविष्यासाठी
झुगारून परंपरेचे पाप
व्हावे म्हणतो मुक्त फिनिक्स पक्षासारखे
येणाऱ्या पिढीचे भविष्य घडविण्यासाठी...

**चंद्रकांत पुरी**
मुंबई
ईमेल chandrakantpuri@yahoo.co.in